**राष्ट्रीय सेवा योजना**

**वार्षिक अहवाल**

**सन २०१६-१७**

**राष्ट्रीय सेवा योजना नियमित अहवाल २०१६-१७**

१ ५ जून २०१६ रोजी पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. पर्यावरण दिनानिमित्त महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नीलकंठ भुसारी व मा. गुलाबरावजी खेडेकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला ७० रा. से.यो. स्वयंसेवक उपस्थित होते.

२१ जून २०१६ रोजी जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा. महादेवरावजी भुईभार साहेब यांनी कार्यक्रमाला उपस्थित रा.से.यो. स्वयंसेवक व शहरातील नागरिक यांना योगांचे प्रत्याक्षिक करून योगा बद्दल मार्गदर्शन केले.

१ जुलै ते १० जुलै दरम्यान महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या वानमोहत्सव अंतर्गत महाविद्यालयाच्या तसेच सहरातील सार्वजनिक ठिकाणी ५०० वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. या राबविण्यात आलेल्या वनमौहत्सव सप्ताहात महाराष्ट्राचे गृहराज्यमंत्री मा.रणजीत पाटील साहेब, तसेच चिखली मतदारसंघाचे आमदार मा. राहुल भाऊ बोंद्रे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

१५ जुलै ते १ ऑगस्ट दरम्यान रा.से.यो. स्वयंसेवकांची २०१६-१७ साठी नोंदणी करण्यात आली. या सत्रात २०० विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली.

३१. जुलै रोजी आंतरराष्ट्रीय स्वच्छता दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रा.के.डी. पेन्शनवार सर अध्यक्ष म्हणून लाभले होते. या दिनानिमित्त महाविद्यालयाच्या वतीने परिसराची स्वच्छता करण्यात आली.

९ ऑगस्ट २०१६ क्रांती दिनानिमित्त रा.से.यो.विद्यार्थ्यांकरिता उधबोदन वर्गाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठचे रा.से.यो.चे समन्वयक डॉ. गणेश मल्ट सर, मा. महादेवरावजी भुईभार यानी मार्गदर्शन केले.

२३ ऑगस्ट २०१६ रोजी रा.से.यो. चळवळ या अर्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाला क्षेत्रीय समन्वयक डॉ.व्ही.यु.पोच्छी यांनी मार्गदर्शन केले.

**२५ ते ३०** ऑगस्ट दरम्याण स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

**५ सप्टेंबर** रोजी शीक्षक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.नीलकंठ भुसारी साहेब अध्यक्ष म्हणून लाभले होते. या दिनाचे औचीत्य साधून स्वयमशासन दिन साजरा करण्यात आला.

**१३ सप्टेंबर २०१७** रोजी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा आयोजीत करण्यातआले. स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन कर्यशळेला रा. से.यो. चे १२० स्वयंसेवक उपस्थित होते.

**२४ सप्टेंबर २०१७** रोजी रा. से. यो. दिन साजरा करण्यात आले.या कार्यक्रमाला अध्यक्ष के.डी पेन्शनवार सर लाभले होते. रा.से.यो. दिनानिमित्त महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या स्वच्छता अभियानात रा.से.यो चे १०० विद्यार्थी उपस्थित होते.

**२ ऑक्टोबर २०१६** महात्मा गांधी जयंती निमित्त गांजर गावात निर्मुल अभियान राबविण्यात आले.या दिनाचे औचित्य साधून वरा.से.यो. स्वयंसेवकांकडून स्वच्छता शपथ घेण्यात आली.

**२१ नोव्हेंबर २०१६** रोजी प्लास्टिक निर्मुलन व स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वच्छते बद्दल जागृती होण्याकरिता स्वच्छता रैली काढण्यात आली. या रैली मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक सहभागी झाले होते.

**२६ नोव्हेंबर २०१६** संविधान दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संविधान दिनानिमित्त रा.से.यो.विद्यार्थ्यांनी संविधानाची शपथ घेतली. संविधान दिनानिमित्त संविधान फेरीचे आयोजन करण्यात आले.

**१० डिसेंबर २०१६** रोजी राष्ट्रीय सेवा योजन व एच. डी. एफ. सी. बँक चिखली यांच्या वतीने महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबिरात ४० रा.से.यो. स्वयंसेवकांनी रक्तदान केले.

**२० डिसेंबर २०१६** रोजी संत गाडगे बाबा जयंती निमित्त वृक्षारोपण करण्यात आले.वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाला महाराष्ट्र बँकेचे शाखा प्रमुख श्री. आसेगावकर साहेब यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमात १०० वृक्षांचे रोपण करण्यात आले.

**११ जानेवारी ते १८** जानेवारी दरम्यान रा से यो शिबिराचे दत्तक ग्राम मुंगसरी येथे आयोजन करण्यात आले.

**२४ जानेवारी २०१६** रोजी लेक वाचवा अभियाना अंतर्गत बेटी बचाव बेटी पढाव जनजागृती करण्यासाठी रैली काढण्यात आली. या रैली मध्ये महाविद्यालयाच्या विद्याथिनी उत्स्फुर्तपणे सहभागी झाल्या.

**२६ जानेवारी** २० रोजी गणतंत्र दिनानिमित्त महाविद्यालयात रा.से.यो. च्या वतीने राबविण्यात आलेल्या माणुसकीचा झरा या समाजउपयोगी उपक्रमाकरिता दान फेरी काढण्यात आली. या दान फेरीत पत्रकार बंधू , शहरातील ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते.

**१२ जाने ते १८ जाने २०१६** ते राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दत्तक ग्राम मुंगासरी येथे विशेष श्रम संस्कार शिबिराचे आयोजा करण्यात आले. शिबिरात वेह्वेगले ग्राम उपयोगी उपक्रम राबविण्यात आले. दत्तक ग्राम मुंगसरीचि निवड तालुक्यातील सर्वात स्वच्छ गाव म्हणून निवड करण्यात आली. निवड करण्यासाठी शासनाच्या समितीने शिबिरादरम्यान भेट दिली होती.

**२७ जानेवारी** रोजी फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या निवडणुकी मध्ये मतदारांनी मतदान करावे म्हणून, चिखलीतील ज्येष्ठ नागरिक व रा से यो च्या वतीने रेल व्हे आयोजन करण्यात आले. तसेच रा.से.यो. स्वयंसेवकांनी मतदार जनजागृतीकारिता घरोघरी जाऊन मतदाना जागृती चे प्रसिद्धी पत्रकांचे वाटप केले.

**१९ फेब्रुवारी** रोजी शिवजयंती निमित्त साजरी करण्यात आली.

३ मार्च २०१७ रोजी महिला सशक्तीकरण अंतर्गत कार्यालयीन ठिकाणी होणारे महिलांवरील अत्याचार या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यक्रमाला प्रा.सौ.काटोले प्रा. सौ. पोच्छी महिला प्रध्यापिकानी कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले .

८ मार्च २०१७ रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आले. त्यानिमित्ताने चिखली मतदार संघातील नवनिर्वाचीत महिला उमेदवारांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आले.

८ मार्च २०१७ रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आले. त्यानिमित्ताने चिखली मतदार संघातील नवनिर्वाचीत महिला उमेदवारांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आले.

प्राचार्य

कार्यक्रम अधिकारी

१ प्रा. महेश आ. पवार

२.प्रा.एस.एम. कालाखे